सकाळ

# विद्यापीठात आजपासून क्रीडा महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शिवस्पंदन क्रीडा महोत्सव प्रथमच आयोजित केला आहे. या महोत्सवाचे उद्‌घाटन उद्या, मंगळवारी सकाळी आठ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या महोत्सवामध्ये कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट, ॲथलेटिक्स, बुद्धिबळ या क्रीडा प्रकारांतील स्पर्धा होतील. महोत्सवाची सांगता शुक्रवारी (ता. २१) 'रन फॉर हेल्थ अँड फिटनेस' मॅरेथॉनने होणार आहे, अशी माहिती क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

तरुण भारत

# शिवस्पंदन क्रीडा महोत्सव आजपासून

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत 'शिवस्पंदन' क्रीडा महोत्सवाला आज (दि. १८) सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. हा क्रीडा महोत्सव २१ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट, ॲथलेटिक्स, बुध्दिबळ आदी खेळांचा समावेश आहे. क्रीडा महोत्सवाची सांगता 'रन फॉर हेल्थ अँड फिटनेस', मॅरेथॉन या खेळाने होईल. मॅरेथॉनमध्ये शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व अधिकारी सहभाग नोंदवणार आहेत. विद्यापीठ परिसरात मॅरेथॉन होणार असून १ हजार ८०० हून अधिक खेळाडूंनी नावनोंदणी केली आहे. खेळाडूंना मेडल ट्रॉफी देऊन सत्कार व चॅम्पियन ट्रॉफी देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठातील क्रीडा विभागाच्या वतीने प्रसिध्द केली आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज क्रीडामहोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन २०२२-२३ या क्रीडामहोत्सवास मंगळवारी (दि. १८) सकाळी ८ वाजता प्रारंभ होणार आहे. या क्रीडामहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के करणार आहेत. विविध अधिविभागांचा सहभाग असलेला हा क्रीडामहोत्सव १८ ते २१ एप्रिल या कालावधीत होणार आहे. महिला आणि पुरुष संघात होणाऱ्या कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट, ॲथलेटिक्स, बुद्धिबळ या खेळांचा समावेश आहे. महोत्सवाची सांगता विद्यापीठ परिसरात होणाऱ्या 'रन फॉर हेल्थ ॲण्ड फिटनेस' मॅरेथॉनने होणार आहे. यामध्ये सर्व अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व अधिकारी सहभागी होणार आहेत.

**पुढारी**



# शिव स्पंदन क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत प्रथमच शिव स्पंदन क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १८ एप्रिल पासून क्रीडा महोत्सवाला सुरुवात होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

क्रीडा महोत्सवामध्ये कबड्डी, रस्सीखेच, क्रिकेट, ॲथलेटिक्स, बुद्धिबळ या खेळांचा समावेश आहे याचबरोबर महोत्सवाची सांगता 'रन फॉर हेल्थ अँड फिटनेस' मॅरेथॉनने होणार आहे. या मॅरेथॉनमध्ये विद्यापीठाच्या सर्व अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठाचे सर्व अधिकारी, सहभाग घेणार आहेत .मॅरेथॉन विद्यापीठाच्या परिसरामध्ये होणार आहे. आठरशेहून अधिक खेळाडूंची नोंदणी झालेली आहे.

18 APR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ खो-खो : शिवाजी विद्यापीठाला सुवर्ण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ (पुरुष) संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, संभाजीनगर विद्यापीठ संघावर दोन गुणांनी मात करून सुवर्णपदक प्राप्त केले. मेरठ (उत्तर प्रदेश) येथील चौधरी चरणसिंह विद्यापीठमध्ये या स्पर्धा सुरू होत्या.

अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात दोन्ही संघांचे गुणफलक समान राहिले. दुसऱ्या डावामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने औरंगाबाद विद्यापीठाचे नऊ खेळाडू बाद केले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाकडून प्रद्युम्न पाटील, अनिकेत पोटे, अतिक शेख, शुभम लगारे, सौरभ घाटगे यांनी उत्कृष्ट आक्रमण केले. डावातील दुसऱ्या फेरीत विजयासाठी औरंगाबाद विद्यापीठ संघास दहा गुण मिळवणे आवश्यक होते; परंतु नऊ मिनिटांच्या या सामन्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या राजवर्धन पाटील, अर्णव पाटणकर यांचा अष्टपैलू खेळ व रोहन कोरे, रोहन शिंगाडे, कुणाल गायकवाड या खेळाडूंच्या भक्कम संरक्षणमुळे औरंगाबाद विद्यापीठाला केवळ ८ खेळाडू बाद करता आले. सामन्यामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने अवघ्या एक गुणाने पराभव करून सुवर्णपदक प्राप्त केले. विजयी संघास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

विजयी संघामध्ये रोहन शिंगाडे, अर्णव पाटणकर, शुभम लगारे, रोहन कोरे, सौरभ घाडगे, सागर गायकवाड, काशिलिंग हिरुकुब, प्रद्युम्न पाटील, अरुण सावंत, अतिक शेख, अशितोष पवार, स्वराज चौगुले, राजवर्धन पाटील, अनिकेत पोटे, राकेश काकूमुनी यांचा समावेश होता. प्रशिक्षक म्हणून डॉ. देवेंद्र बिरनाळे, संघ व्यवस्थापक हर्षवर्धन पाचोरे यांचा समावेश होता.



**मेरठ : सुवर्णपदक विजेता शिवाजी विद्यापीठाचा पुरुष संघ.**

## बारा वर्षांनंतर सुवर्णपदकाचा मान

शिवाजी विद्यापीठ संघास २०१२ पासून सुवर्णपदक हुलकावणी देत होते. दरम्यानच्या काळात विद्यापीठ संघाने ४ वेळा ब्राँझपदक प्राप्त केले होते, तर दोन वेळा अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या विजयाने सुवर्णपदकाचा दुष्काळ संपला.

लोकमत

# राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटीलला कांस्य

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मेरठ येथील सुभारती विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत शिवाजी



विद्यापीठाची ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात कांस्य पदक पटकाविले. या स्पर्धेत देशभरातील ७० विद्यापीठांतील नेमबाजांनी सहभाग घेतला होता. १० मीटर एअर रायफल प्रकारात ज्ञानेश्वरीने ४२०.९ गुण मिळवत, तिसरा क्रमांक पटकावित कांस्य पदकाला गवसणी घातली. तिची उत्तर प्रदेशातील लखनौ येथे होणाऱ्या विद्यापीठ खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्रशिक्षक संतोष जाधव, तेसज कुसाळे, रमेश कुसाळे व जिल्हा मेन अँड वुमेन रायफल असोसिएशनचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# उन्हाळी सत्रातील परीक्षा वेळापत्रक जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया गुरुवार दि. २० पासून सुरू होणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. आदी ८४८ परीक्षा या उन्हाळी सत्रात घेण्यात येणार आहेत. त्यासाठी विनाविलंब अर्ज भरण्याची मुदत २९ एप्रिलपर्यंत आहे. विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ३ ते ८ मे आणि अतिविलंब शुल्काची मुदत १० ते १२ मेदरम्यान आहे.

सकाळ

# 'विद्यापीठाच्या परीक्षांचे अर्ज गुरुवारपासून भरा'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया गुरुवारपासून (ता. २०) सुरू होणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. आदी ८४८ परीक्षा या उन्हाळी सत्रात घेण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
18 APR 2023
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

## शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२३ (उन्हाळी) परीक्षांसाठी अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत. विनाविलंब शुल्कासह २० ते २९ एप्रिलपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचे आहेत. विलंब शुल्कासह ३ ते ८ मेपर्यंत तर अतिविलंब शुल्कासह १० ते १२ मेपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालयांनी विनाविलंब शुल्कासह ४ मे, विलंब शुल्कासह ११ मे आणि अतिविलंब शुल्कासह १६ मेपर्यंत विद्यापीठातील परीक्षा विभागात अर्ज सादर करावयाचे आहेत. तरी याची दखल विद्यार्थी, महाविद्यालयांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या परीक्षांचे अर्ज पदवी व पदव्युत्तर कला, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, बी. होक, वायसीएसआरडीकडील अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्सटाईल्स, बी-टेक, विधी, एम. बी. ए., आदी अभ्यासक्रमासाठी भयावयाचे आहेत. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागांचे परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह २ मे, विलंब शुल्कासह ९ मे आणि अतिविलंब शुल्कासह १३ मेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने ॲप्रुव्हल करावयाचे आहेत. महाविद्यालयांनी सर्व परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात ऑनलाईन भरावयाचे आहेत. परीक्षा अर्ज भरण्यासाठी दिलेल्या मुदतीनंतर भरलेले परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. प्रथम वर्षाच्या नवीन व विनाविलंब परीक्षा शुल्कामधून ७५ टक्के रक्कम महाविद्यालयांनी ठेवून घ्यावी. २५ टक्के रक्कम विद्यापीठाकडे जमा करावी. यासह अन्य सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तरी विद्यार्थी व पालकांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

### पात्रता पूर्ण नसणाऱ्यांचे परीक्षा अर्ज उपलब्ध होणार नाहीत

अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा अर्ज भरण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांची प्रवेशानंतर अद्याप पात्रता पूर्ण झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन उपलब्ध होणार नाहीत. संबंधित विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयाने पात्रता विभागाशी संपर्क साधून पात्रता पूर्ण करून घ्यावयाची आहे.